INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 12 | JANUARY - 2024

# भारतातील आर्थिक सुधारणा आणि ग्रामीण विकास

भारत सर्जेराव जमधडे

## प्रस्तावना :



आज भारतासोबतच सर्व जगाचा विकास झपाट्याने होत आहे. असे असले तरी आजही जागतीक लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्याचे प्रमाण १९५० मध्ये ७९ टक्के पेक्षा अधिक होते. भारतात १९६१ मध्ये ८२ टक्के लोक ग्रामीण भागातच राहत होते. तर १९७१ मध्ये हे प्रमाण ८० टक्के होते. शिवाय आजही हे प्रमाण सन २०११ च्या आकडेवारीनुसार कमी झालेले नसून ६५ टक्के ते ७० टक्के आजही आहे. यासाठी महत्त्वाचे म्हणजे नियोजनाद्वारा राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरतो आणि म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरुप नीटपणे समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी कसोटीने प्रयत्न करावे लागतात. कोणताही राष्ट्रीय ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावीत असतो. अन्नधान्यांचे व इतर माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते आणि या बाबतीत शहरांची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविली जाते. शिवाय शहरातील औद्योगिक व्यवसायांना श्रमिक पूरविण्याची जबाबदारीही ग्रामीण भाग पार पाडत असतो. राष्ट्रांची नैसर्गिक साधनसंपत्ती बहुवंशी ग्रामीण भागातच उपलब्ध होते आणि बहुसंख्य लोकांची वस्तीही खेडेगावातच असते.

भारत हे विकसनशील राष्ट्र असल्यामुळे इतर राष्ट्रांनासुद्धा ग्रामीण विकासाची गरज भासते कारण ग्रामीण भागात कृषीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते आणि प्रत्येक देशाला अन्नधान्यांची अत्यंत महत्वपूर्ण गरज भासते. अशा राष्ट्रांना आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासनाला करावे लागतात. आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या रूढी, चालीरिती याचे ग्रामीण जीवनातील वर्चस्व कमी व्हावे म्हणून शिक्षणाच्या व दळवळणाच्या सोयी भरपूर प्रमाणावर पुष्कळ ग्रामीण जनतेला विकसोन्मुख केल्यानंतर ग्रामीण विकासाचे पाऊल पुढे पडू शकते. १९ व्या शतकात भारतातील औद्योगिकिरणाला सुरुवात झाली. इंग्लंडमधील कारखानदारीमुळे येथील परंपरागत उद्योग बसले आणि नविन उद्योगाला सुरुवात झाली आहे.

आर्थिक प्रणाली मजबूत करण्यासाठी आर्थिक समावेशाद्वारे आर्थिक विकास प्रभावित करण्यासाठी देशांतर्गत आर्थिक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी दारिद्र्य कमी करण्यासाठी किरकोळ गरिब तसेच ज्यांना अर्थव्यवस्थेत प्रवेश मिळत नाही किंवा आर्थिक विकासाचे फायदे मिळू शकत नाहीत अशा पर्यत पोहचून कामयस्वरूपी विकास प्राप्त करण्यासाठी अनेक पावले उचलली गेली आहेत.

## समावेशक आर्थिक विकास म्हणजे काय ?

भारतातील शहरी व ग्रामीण कमकूवत विभाग आणि कमी उत्पन्न गटांसारख्या कमजोर गटांना, परवडणाऱ्या किंमतीमध्ये मिळालेले वेळेवर आणि पुरेशे क्रेडिट किंवा पत यासह वित्तिय सेवांमध्ये प्रवेश सुनिश्चित करण्याची प्रक्रिया

अशी व्याख्या करु शकतो. म्हणजेच वित्तीय सुधारणेमुळे देशाचा समावेशक विकास घडून या व्यवस्थेतून, वित्तीय आणि भौतिक मालमत्ता तयार करणे तसेच शिक्षण,आरोग्य आणि व्यवसायासाठी कर्ज घेणे या गोष्टी सुलभ होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अनपेक्षित परिस्थिती आणि वृद्धत्वासाठी बचत करणे, शक्य होते तसेच दारिद्रय आणि असमानता कमी करण्यासह मदत होते आणि देशाचे आर्थिक परिस्थिती सुधारल्याशिवाय सर्व समावेशक आर्थिक विकास शक्य होणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. ग्रामीण व शहरी आर्थिक विकासाचा आढावा घेणे
२. नविन आर्थिक बदलांचा अभ्यास करणे
३. समुह विकास योजनेअंतर्गत झालेल्या ग्रामीण व शहरी विकास याचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय आधार सामग्रीचा वापर करण्यात आला असून यासाठी संदर्भ पुस्तके, नियतकालिके, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी स्त्रोतांचा वापर केला आहे.

**नविन आर्थिक बदलांचा आढावा :**

प्रत्येक आर्थिक प्रणालीत नविन बदल होणे खूप महत्वाचे आहे. याच बरोबर भौतिक सुधारणा आरोग्य, शिक्षण आणि व्यवसायासाठी कर्ज घेणे या गोष्टी सुलभ होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अनपेक्षित परिस्थिती आणि वृद्धात्वासाठी बचत करणे शक्य होते तसेच दारिद्रय आणि असमानता कमी करण्यासाठी त्यामुळे मदत होते. अर्थार्जन करणाऱ्या व्यक्तिंचे निधन किंवा अपघात झाल्यास संरक्षण देणे आणि उतारवयासाठी सुरक्षा प्रदान करणे अशा प्रकारच्या आर्थिक सेवा यामुळे प्रदान केल्या जातात. वित्तीय समावेश म्हणजे, अधिक पारदर्शकता, रोख रोख्यांना खात्यातील व्यवहारांमध्ये रूपांतरीत करणे, बँकिग प्रणाली मजबूत करणे आणि क्रेडिट किंवा पत निर्मिती प्रक्रिया कमी करणे, काळा पैसे, भ्रष्टाचार कमी करणे आणि देशाच्या स्त्रोतांवर सामान्य मनुष्याला समान अधिकाराचे लाभ प्रदान करणे. यामुळे बँक ठेवीमध्ये गुंतवणूक करणे, विम्याच्या उत्पादनांमध्ये योगदान देणे, आर्थिक मालमत्ता इ.ची कार्यक्षमता आणि स्थिरता याविषयीचे भय काढून टाकून शेअर बाजारांमध्ये आणि इतर आर्थिक यंत्रणामध्ये भाग घेणे देखील वित्तीय समावेशामुळे सुलभ होत आहे.

**नविन वित्तीय योजना :**

भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या बाबतीत पुढाकार घेऊन अनेक उपाययोजना केल्या आहेत. उदा. नो फ्रिल खाती, बचत खात्यामध्ये ओव्हर ड्राफ्ट बीसी, बीएफ मॉडेल, केसीसी, जीसीसी मार्गदर्शक तत्वे, उदारीकरण शाखा विस्तार, तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा सादर करणे, प्रीप्रेड कार्ड, मोबाईल बँकिंग इ. आरआरबी/सहकारी बँकाना विमा आणि आर्थिक उत्पादनांना परवानगी, आर्थिक साक्षरता कार्यक्रम, एसएचसी, कोअर बँकिग प्रणाली (सीबीएस) नॅशनल इलेक्ट्रानिक फंड ट्रान्सफर, (एनईएटरी) नॅशनल इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्विस (एनईसीएस) तात्काळ देरीक सेवा (आयएसपीएस) आणि आधार सक्षम देयके सेवा इत्यादी होय.

प्रधानमंत्री जनधन योजना पीएमजेडीवाटा म्हणून जनधन योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वित्तीय समावेशनाच्या कार्यक्रमाच्या शुन्य शिल्लक या वैशिष्ट्यामुळे लोकांना आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहाचा भाग बनायला खूप मदत झाली. २३ जानेवारी २०१९ पर्यंत ३४ कोटी ३ लाख इतकी बँक खाती उघडण्यात आली आहेत आणि या लोकांना विविध सरकारी योजनांचा फायदा झाला आहे.

यापैकी २० कोटी १४ लाख लोक हे ग्रामीण आणि अर्ध शहरी भागातील आहेत. प्रधानमंत्री जनधन योजना (पीएमजेडीवाय) ही योजना, मुलभूत बचत बँक खात्याची उपलब्धता, गरजेवर आधारित क्रेडिट किंवा पत, प्रेषण सुविधा, कमकुवत विभाग आणि कमी उत्पन्न गट यासारख्या वगळलेल्या विभागांना विमा आणि पेंशन इत्यादी विविध वित्तीय

सेवामध्ये प्रवेश प्रदान करते. या योजनामुळे ठेवींवरील व्याज एक लाख रुपयांचे अपघाती विमा संरक्षण, किमान शिल्लक रक्कम आवश्यक नाही. ३०,००० रूपयांचे जीवन विमा संरक्षण, ६ महिन्यानंतर ओव्हरड्राफ्ट सुविधा, निवृत्तीवेतनाची सोय, विमा उत्पादन, रूपे डेबिट कार्ड तसेच प्रति कुटूंब फक्त एका खात्यात रूपये ५०००/- पर्यंत ओव्हरड्राफ्ट इत्यादी सुविधा मिळतात.

वित्तीय समावेशनाचाा एक भाग म्हणून असलेला मुद्रा योजनेचा उद्देश म्हणजे रोजगार निर्मिती आहे. त्याचप्रमाणे गरिब आणि लहान उद्योजकांना नविन उद्योग सुरु करतांना सुरुवातीला प्रोत्साहन म्हणून १० लाख रुपयापर्यंतच्या कर्जाची उपलब्धता करुन देणे सामाजिक सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जिवनज्योती विमा योजना यासारख्या अनेक योजना राबविल्या जात आहेत.

वित्तीय क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे नोटबंदी, जीएसटी आणि डिजिटल बँकिंग, इंटरनेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंग यामुळे देशभरातील दीड लाख टपाल कार्यालयाचे रूपांतर पेमेंट बँकामध्ये करण्यात आले. त्याचप्रमाणे दूरवरच्या भागात पोहोचण्यासाठी ११ पेमेंट बँकांना परवानगी देण्यात आली आहे. शिवाय अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प २०१९ मध्ये थेट उत्पन्नाला सहाय्यक ठरणारी वित्तीय समावेशनाची काही वैशिष्ट्ये अशी आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत १२ कोटी शेतकऱ्यांना बँक खात्यामध्ये प्रतिवर्षी ६०००/- थेट जमा होणार,१० कोटी श्रमिक किंवा कामगारांसाठी प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन ही निवृत्ती वेतन योजना चालू करुन अशा विविध आर्थिक सक्षम होण्यासंदर्भातील योजना शासनाच्या माध्यमातून चालू केल्या आहेत.

## समुह विकास योजना :

ग्रामीण विकासाचे हे विविध प्रश्न हाताळण्यासाठी सरकारच्या वेगवेगळया खात्यामार्फत आखलेल्या योजनांना पंचवार्षिक योजनात स्थान देण्यात आले पण विविध खात्याच्या योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत अधिक चांगले संयोजन व्हावे. ग्रामीण भागावर त्याचा आवश्यक त्या प्रमाणात परिणाम व्हावा आणि मुख्य म्हणजे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत स्थानिक जनतेला सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी या हेतूने समूह विकास योजनेचा हा दृष्टीकोन पहिल्या पंचवार्षिक योजनेतच स्वीकारल्या गेला आहे. सुमारे ८ ते ७० हजार लोकसंख्या असलेल्या प्रदेशाच्या एक विकास खंड मानावयाचा विकास कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी गट विकास अधिकारी व त्याच्या नेतृत्वाखाली शेती, पशुपालन सामाजिक शिक्षण यांच्यासाठी एक विस्तार अधिकारी, एक अधिक्षक इतका सेवकवर्ग प्रत्येक खेड्यासाठी पूरवावयाचा, रस्ते, शाळांच्या इमारती पीकाच्या पाण्याची योजना, समाजमंदिर, वगैरे स्थानिक विकासाचे प्रकल्प हाती घ्यावयाचे असे या योजनेचे थोडक्यात महत्त्वपूर्ण उद्देश्य आहेत.

## निष्कर्ष :

वरील स्पष्टीकरणावरून असे लक्षात येते की, भारतातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व समावेशक आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर प्रत्येक आर्थिक सक्षम होण्यासारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक योजनांना प्राधान्य देवून विकासात्मक योजनेची झपाट्याने अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरते. हे लक्षात येते. प्रत्येक शेतकऱ्याला संरक्षण व सुविधा प्रदान करणे महत्त्वाचे ठरते. ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी आर्थिक संदर्भात मोठ्या तरतूदी करुन आर्थिक उद्योगांना अधिक कर्जे वाटप करणे महत्त्वाचे आहे. कारण जागतिक पातळीवर वित्तीय समावेशक विकास हे समाजाच्या विकासाचे आणि कल्याणाचे एक महत्वपूर्ण सूचक असल्याने आर्थिक विकासाचा समावेश करणे ही महत्त्वाची काळाची गरज आहे.

शहरी आणि ग्रामीण भागामध्ये डिजीटल पायाभूत सुविधा शिक्षण, आरोग्य आवश्यक आहे. कर्ज देणाऱ्या मंचावर सहकार्य करणे, याला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. स्मार्ट फोन, मोबाईल बँकिंग, गुंतवणूक सेवा आणि क्रिस्टोचलन रिझर्व्ह बँकेद्वारे जारी करणे इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि सॉफ्टवेअरचा जास्तीत जास्त वापर करणे महत्वाचे ठरते हे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. मिश्रा एस. के. पुरी वी.के. भारतीय अर्थव्यवस्था हिमालय पब्लिकेशन, मुंबई
२. बोधनकर सुधीर, कानटेकर मेघा, भारतीय बँकिंग प्रणाली, साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. Jain S.C. Community devoplment and panchayat raj in India, Bombay,1967
४. Government of India, Report of the Committee an Community development and panchyatraj , New Delhi-1967
५. Narasaiah M.L. Approaches to Rural Development
६. योजना मासिक, मार्च २०१९
७. योजना, मासिक डिसेंबर, २०१८
८. योजना, मासिक, डिसेंबर,२०१८
९. दै.लोकमत, ८ आक्टोबर, २०१८